आर.सी.सी क्र. १९६५/२०१६

सरकार विरुध्द अब्दुल करीम

**निशाणी क्र. ४४ / क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. मनोज रुपसिंग राजुरे,**

वय – ५३ वर्षे, व्यवसाय – व्यापार,

निवासस्थान– शास्त्रीनगर, बुलढाणा.

---

**<u>सरतपासणी अभियोग पक्षा करीता</u>**

**<u>श्री. ए. झेड. काझी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –</u>**

१. दिनांक ०७.०६.२०१६ रोजी माझी आणि पोलीसांची सातारा, औरंगाबाद पोलीस स्टेशन येथे भेट झाली होती. इम्रानकडुन एक चाकू जप्त झाला होता. त्याचा पंचनामा माझ्यासमक्ष झाला होता. मला पंचनामा दाखविला. यावर माझी, पोलीसांची व आरोपीची सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. या पंचनाम्याला **<u>निशाणी क्र.४५</u>** देण्यात येत आहे. जप्त चाकू मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला आता जप्त चाकू दाखविण्यात आला, हा तोच आहे. त्यास **<u>आर्टीकल–अ</u>** देण्यात येत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपासणी आरोपी पक्षा तर्फे श्री. आय. जी. दूरार्णी, विधीज्ञ यांचे द्वारा–</u>**

२. माझा बुलढाणा येथे दुधाचा व्यवसाय आहे. रुपसिंग राजुरे हे माझे वडील आहेत व श्री. सुभाष देशमुख हे माझ्या वडीलांचे मित्र आहेत. श्री. गणेश मगन सोनवणे यांना रुपसिंग राजुरे व श्री. सुभाष देशमुख यांनी मुखत्यार पत्र लिहून दिले होते. हे म्हणने खरे आहे की, गणेश सोनवणे यांना मी चांगल्यारितीने ओळखतो.

३. मला लेखी नोटीस, सुचना अथवा पंचनाम्याकरीता दिलेले नव्हते. हे म्हणने खरे आहे की, गणेश मदन सोनवणेसोबत मी पोलीस ठाण्यात गेलो होतो. हे म्हणने खरे नाही की, पोलीसांनी मला चाकू दाखविला. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, गणेशने मला चाकू दाखविला होता. हे म्हणने खरे आहे की, पंचनामा आधिच लिहून तयार होता मला पोलीसांनी फक्त सही करायला

सांगीतली होती. हे म्हणने खरे आहे की, गणेश मदन सोनवणे यांनीच आम्हाला पंचनाम्यासाठी बुलढाण्यावरून औरंगाबाद येथे बोलाविले होते. हे म्हणने खरे नाही की, आरोपींना यापुर्वी मला कधीही पाहण्याचा प्रसंग आला नव्हता. हे म्हणरे खरे आहे की, मुद्देमाल आर्टीकल-अ चाकू सारखे चाकू बाजारात सहज उपलब्ध असतात. हे म्हणने खरे नाही की, गणेश मदन सोनवणेच्या सांगण्यावरून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणताही चाकू जप्त झाला नाही व कोणताही पंचनामा झाला नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास काही नाही.**

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| --- | --- |
| -/Sd/- | -/Sd/- |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक- ०९/०७/२०२४